# समाज सुधारणामध्ये शाहू महाराजांचे योगदान – एक समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. चामे हरिश्चंद्र व्यंकटराव,** सहाय्यक प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, विवेकानंद कॉलेज कोल्हापूर. (स्वायत्त)

...........................................................................................................................................

**प्रस्तावना :**

छत्रपती शाहू महाराजांचा जन्म कोल्हापूर येथे २६ जून इ. स. १८७४ रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. शाहू महाराजांचे मूळ नाव यशवंत त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव आईचे नाव राधाबाई होते. एक एप्रिल १८९१ रोजी बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांच्या लक्ष्मीबाई या कन्याशी शाहू महाराजांचा विवाह झाला. दोन एप्रिल १८९४ रोजी त्यांचा राज्यरोहण समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर इ. स. १९२२ सालापर्यंत म्हणजेच २८ वर्षे ते कोल्हापूर संस्थानाचे राजे होते.

महाराजांनी आपल्या संस्थानात बहुजन समाजातील लोकांना उद्योग व व्यापार करता यावा यासाठी त्यांनी शाहू मील उभारली, व्यापार करण्यासाठी रेल्वेची सुविधा केली, शेतीसाठी पाणी लागते त्यासाठी राधानगरी सारखे मोठे धरण बांधण्यात आले. महाराजांना कला, क्रीडाक्षेत्राची आवड होती त्यामूळे त्यांनी कुस्तीचे आखाडे बांधले, नाट्यगृह बांधले, महाराजांनी आपल्या संस्थानात जनहितार्थ अनेक कामे केली. या कार्याची नवीन पिढीला माहिती मिळावी या उद्देशाने हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे.

राजर्षी शाहू महाराज यांनी त्यांच्या संस्थानांत दलित, आदिवासी, स्त्रिया यांच्यासाठी ५० टक्के राखीव जागा ठेवल्या व त्यांचा सर्वांगीण विकास साधता यावा हा त्या मागचा उद्देश होता. शाहू महाराज यांनी जातीभेद नष्ट झाले पाहिजे यासाठी त्यांनी आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन दिले. त्यांनी त्याची अंमलबजावणी स्वत:च्या घरातून केली त्यांनी आपल्या घरातील मुलीचा विवाह हा होळकर घराण्यातील मुलाशी करून आपण जातीयता मानत नाही. हेच सिद्ध केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांचे खूप जिव्हाळ्याचे संबंध होते. माणगाव येथे जी दलित अस्पृश्य परीषद भरवली त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच अखंड हिंदुस्थानचे नेते होतील असे जाहीर केले.

एकूणच छत्रपती राजर्षी शाहू महाराज हे लोक कल्याणकारी राजे होते. त्यांनी बहुजन समाजाचे कल्याण कसे होईल हाच विचार केला आणि सतत न्यायाची आणि कल्याणकारी योजनांचा भूमीका घेतल्याचे दिसून येते

छत्रपती शाहू महाराज एक दूरदृष्टी असणारा राजा त्यांनी आपल्या जीवनात समाजसेवेला महत्त्व दिले. बहुजनाच्या हिताचा विचार केला. त्यांचे विचार समाजसुधारणा करणारे होते. सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी शाहू महाराजांनी धोरणात्मक निर्णय घेतले. असे अनेक निर्णय जे शाहू महाराजांनी आपल्या काळात घेतली ते निर्णय आज ही महत्वाचे ठरतात. आज चे राज्य करते. शाहू महाराजांच्या विचारणा आपल्या धोरणात्मक निर्णयात सहभागी करून घेतात.

**संशोधनाचा उद्देश :**

- शाहू महाराजाच्या शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाचा अभ्यास करणे.
- शाहू महाराजाचे सामाजिक परिवर्तनातील भूमिका अभ्यासणे.
- शाहू महाराजांच्या धोरणांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध प्रबंधामध्ये तथ्य संकलनासाठी दुय्यम संकलन पद्धतीत वर्तमानपत्र पुस्तके संदर्भात इंटरनेट वेबसाईट इत्यादी साधनाचा वापर करण्यात आला आहे.

**शाहू महाराजांचे सामाजिक कार्य :**

बहुजन समाजाची प्रगती झाल्याशिवाय त्यांच्यातील दारिद्र्य अज्ञान अंधश्रद्धा नष्ट होणार नाहीत. यासाठी शाहू महाराजांनी शिक्षणात विशेषत: प्राथमिक शिक्षणावर भर दिला. त्यासाठी त्यांनी १९१७ मध्ये आपल्या संस्थानात व्यक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाचा कायदा केला. प्राथमिक शिक्षणावर मोठ्या प्रमाणात खर्च केला. ग्रामीण भागातील मुलांना उच्च शिक्षणाची संधी मिळावी यासाठी शाहू महाराजांनी कोल्हापूरात मराठा, मुस्लिम, लिंगायत, जैन, सुतार, न्हावी, महार, चांभार, लोहार, यांसारख्या जाती जमातींसाठी शाहू महाराजांनी वस्तीगृहाची स्थापना केली. यामुळे ग्रामीण भागातील मुलांना ज्यांना शिक्षण घेण्याची इच्छा होती. त्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी शहरात राहण्याचे सुविधा नव्हत्या. अशा मुलांना वसतीगृहाचा उपयोग झाला. करणे, गोरगरीब बहुजनांच्या मुलांना उच्च शिक्षण घेता यावे यासाठी २६ जुलै १९०२ ला कोल्हापूर संस्थानात ५०% शासकीय नोकऱ्या मागासलेल्या प्रवर्गासाठी राखीव ठेवण्याचा जाहीरनामा काढला. अशा प्रकारची घोषणा करणारे भारतातले शाहू महाराज हे पहिले राज्यकर्ते होते. अस्पृश्यता नष्ट करणे यावर शाहू महाराजांनी विशेष भर दिला. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी आपल्या संस्थानातील शाळा, पानवटे, विहीरी, दवाखाने, यासारख्या सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्य लोकांना प्रतिष्ठित समजल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या पदावर नोकरीची संधी दिली. गुन्हेगार मानल्या गेलेल्या जातींना हजेरी पद्धतीतून मुक्त केले. विविध भटक्या जातीचे जीवन शाहू महाराजांनी स्थिर केले. स्वत:चे रक्षक म्हणून त्यांची नेमणूक केली. बलुतेदारांना बलुता पद्धतीच्या चौकटीतून मुक्त करून त्यांना व्यावसायिक स्वातंत्र्य बहाल केले. १९१८ मध्ये देवदासी प्रथेस प्रतिबंध करणारा कायदा केला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या मूकनायक वर्तमानपत्रावर इंग्लंडमधील उच्च शिक्षणासाठी शाहू महाराजांनी आर्थिक मदत केली. जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी आंतरजातीय विवाहाला कायदेशीररित्या मान्यता दिली. एवढेच नाही तर

शाहू महाराजांनी धनगर, मराठा यांच्यात विवाह घडवून आणला. बालविवाह यासारख्या प्रथा बंद करून नोंदणी विवाहाचा कायदा केला. घटस्फोट व विधवा पुनर्विवाहाला कायदेशीर मान्यता मिळवून दिली. कुटुंबात होणाऱ्या छळापासून स्त्रियांना संरक्षण देणारा कायदा ही त्यांनी मंजूर केला. मागासवर्गीय मुलींना व स्त्रियांना मोफत शिक्षण दिले.

शाहू महाराजांनी कृषी क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी कृषी व औद्योगिक प्रदर्शने भरवली. शेती उत्पादनासाठी शाहूपुरी, जयसिंगपूर सारख्या बाजारपेठा वसविल्या त्यामुळे गुळाची बाजारपेठ म्हणून कोल्हापूरचे नाव प्रसिद्ध झाले. शाहू महाराजांनी शाहू मिलची स्थापना करून आधुनिक वस्त्रोद्योगास चालना दिली. राधानगरीसारखे धरण बांधून आपल्या संस्थानातील शेतीचा कायापालट केला. सहकारी संस्थांचा कायदा करून सहकार चळवळ मजबूत केली.

एवढेच नाही तर संगीत, नाट्य, चित्रकला, मलविद्या यांसारख्या कलांना राज्याश्रय देऊन महाराष्ट्राच्या कलाक्षेत्रात नवचैतन्य निर्माण केलं. आपल्या दरबारात चित्रकलेला प्रोत्साहन दिले. कोल्हापुरात कुस्तीचे मैदान बांधले. आपल्या संस्थांनांसह सर्व देशातील मल्लांना उदारा आश्रय दिला. कोल्हापुरात साठमारी हत्तीचा खेळ सुरू केला. शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याचा गौरव म्हणून ''कानपूर'' येथे खुर्मी क्षत्रिय सभेने त्यांना ''राजर्षी'' पदवी बहाल केली. शाहू महाराजांनी केलेल्या सामाजिक कार्यामुळे दलितांचा उद्धारक, रयतेचा राजा म्हणून त्यांची प्रतिमा जनसामान्यात निर्माण झाली. शाहू महाराजांनी शिक्षण, अस्पृश्यता, जातीभेद यांसारख्या महत्वपूर्ण विषयात परिवर्तन घडवून आणले. ते निरोगी वृत्तीचे होते. मोकळ्या मनाचे, अतिशय उदार व सत्यवादी होते. स्वत:च्या जीवनामध्ये अनेक संकट आली असताना, शाहू महाराज समाजकल्याणपासून कधीही बाजूला झाले नाहीत.

शाहू महाराज हे समाजातील गोरगरीब बहुजन लोकांच्या हिताचा विचार करणारे, सर्वसामान्यांच्या हिताचे निर्णय घेणारे, एक परिवर्तनवादी राजा होते. त्यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत बहुजनांच्या हिताचे अनेक निर्णय घेऊन जो समाज अनेक वर्षापासून पशुवंत जीवन जगत होता. अशा समाजाला न्याय मिळवून देण्याचे काम छत्रपती शाहू महाराजांनी केले. अनेक वेळा त्यांच्यावर अशी टीका होत असे की ते ब्राह्मणांचे शत्रू आहेत, तरीही त्यांनी सर्वसामान्य लोकांसाठी आपले सामाजिक कार्य कधी थांबवले नाही. शाहू महाराज शांत, संयमी, मनमिळावू होते. धार्मिक व जाती विषमतेला त्यांचा विरोध होता. पुरोगामी विचारसरणीचा अवलंब करणारे होते. शक्ती युक्ती आणि परिवर्तनवादी विचारसरणी यांचा त्रिवेणी संगम म्हणजे शाहू महाराज.

**निष्कर्ष :**

शाहू महाराजांच्या काळामध्ये जातीव्यवस्थेची शिकार झालेलेअनेक जाती जमाती चोऱ्या दरोडे अशा चुकीच्या मार्गाचा अवलंब करत होत्या. सनातनी वर्णव्यवस्थेने त्यांना उपेक्षित ठेवून शिक्षण सत्ता संपत्ती अधिकार नाकारला त्यामुळे त्यांचे जीवन निराशामय झाले होते. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी चोरी, दरोडे घालणे हे मार्ग अवलंबला त्यामुळे ब्रिटिशसरकारने या जमाती गुन्हेगारीचा शिक्का मारला. त्यांना रोज गावकऱ्याकडे हजेरी लालावी लागत असेल. शाहू महाराजांना या लोकांविषयी सहानुभूती होती. त्यामुळे त्यांनी त्यांना हजेरीतून मुक्त केली. खऱ्या अर्थाने सर्वसामान्यांचे दु:ख जाणून घेण्याचे सामर्थ्य राजश्री शाहू महाराज यांच्योकडे होते. मागासलेल्या लोकांना प्रगतीच्या प्रवाहात आणायचे असेल तर त्यासाठी शिक्षणा सोबत राखीव जागा यासारख्या महत्वपूर्ण तरतुदी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात केले. त्यामुळे दलित बहूजन समाजाचा उद्धार होण्यासाठी शाहू महाराजांचे कार्य हे प्रेरणादायी ठरले. शाहू महाराजांनी सामाजातील वाईट प्रथा ज्या अन्याय, अत्याचार, करणाऱ्या होत्या अशा वाईट प्रथांमधून सामाजाचे संरक्षण झालं पाहिजे. सर्वसामान्य माणसाला न्याय मिळाला पाहिजे या हेतूने अनेक वाईट प्रथावर बंधने आणले आणि अनेक कायदे करून समाजातील नागरिकांना सन्मानाने जगता आलं पाहिजे याची काळजी शाहू महाराजांनी घेतली. बहुजन सामाजाच्या उद्धारामध्ये शाहू महाराजांनी जे कार्य केलं त्या कार्याचा आढावा आजचे राजकीय लोक घेतात. आजही सरकार बहुजन समाजासाठी धोरण आखत असताना शाहू महाराजांच्या विचाराचा आदर्श घेत असलेला आपल्याला दिसून येतं. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानामध्ये जे पाण्याचे व्यवस्थापन केलं त्याचाच परिणाम कोल्हापूरातील शेतकऱ्यांचा विकास झाला, शेतकरी सधन बनला?

**संदर्भ :**

१. राजर्षी शाहू छत्रपती पेपस, खंड २ ते ८ संपादक : डॉ. विलास संगवे आणि डॉ. बी.डी खणे, शाहू संशोधन केंद्र, कोल्हापूर.

२. कीर, धनंजय : 'राजर्षी शाहू छत्रपती', एक समाज क्रांतीकारक राजा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९७९, पृ.क्र.५५.

३. फडके, य.दि. : शाहू छत्रपती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.

४. कोल्हापूर दर्शन संपादक : ग. द. भिडे, पु.ल. देशपांडे, इंटरनेशनल पब्लिशिंग सर्व्हिस, पुणे १९६१.

५. राजर्षी शाहू छत्रपतीची निवडक आदेश, भाग २, संपादक : डॉ. अ.प्र. जामखेडकर, डॉ. संजीव प. देसाई, संकलन : शामराव पाटील, पुराभिलेख विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

६. इंटरनेट.

७. वर्तमानपत्र.